MHNG100006712021

सं.फौ.खटला क्र.३०५/२०२१
सरकार – विरुध्द – ए.व्ही. राव

## निशाणी क्र. १ वर आदेश
(पारीत दिनांक १२.०३.२०२६)

प्रकरणाचे अवलोकन केले. फिर्याद ही किमान वेतन कायदा अन्वये दाखल आहे. तक्रार दाखल केल्यानंतर फिर्यादी हे हजर नाही. त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्यानंतर फिर्यादी सतत गैरहजर आहे.

२. मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

३. न्यायालयाने नि.क्र. १ वर वेळोवेळी अर्जदार यांना निर्देश दिल्याचे दिसून येते. आज देखील कोणीही न्यायालयात हजर नाही. प्रकरण हे चार वर्ष जुने आहे. तसेच समन्स काढुन देखील त्याचा अहवाल अभिलेखावर पोलीस कर्मचारी दाखल करीत नाही. प्रकरण उगाचच प्रलंबीत आहे. खटला संक्षीप्त स्वरुपाचा आहे. न्यायालयास फौ.प्र.सं.चे कलम २५६ व २५८ अन्वये अधिकारीता प्राप्त होते. अशा एकंदरीत परिस्थितीवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

१. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५६ अन्वये आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. सबब प्रकरण नस्ती करण्यात येते.

उमरेड.
दिनांक : १२.०३.२०२६

(रा.भा.डोळे)
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, उमरेड.

# <u>प्रमाणपत्र</u>

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव –

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, साक्री.

पी.डी.एफ. फाईल अपलोड केल्याचा दिनांक –

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी – ३